REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 6 | MARCH - 2019

# अण्णाभाऊ साठेंच्या पोवाडा साहित्यातील आणि लावणी लेखनातील वर्गसंघर्ष

प्रा. डॉ. श्रीरंग शामराव लोखंडे
यशवंतराव चव्हाण महाविद्यालय तुळजापूर, जि- उस्मानाबाद.

**प्रस्तावना:-**

अण्णाभाऊ साठेंच्या साहित्यात सामाजिक भान, समाजातील संघर्ष, परिवर्तनाचा प्रवाह जसा ताकदीने पुढे येतो तितकाच ताकदीने वर्ग लढ्याचा ऐतिहासिक भौतिकवादी दृष्टांतसुध्दा राजकीय आणि आर्थिक आशयाने दृष्टीगोचर होतो म्हणजेच वर्णव्यवस्था आणि भांडवलशाहीच्या क्रांतीकारी परीवर्तनाचे अण्णाभाऊ साक्षीदार होते.[१] हे संपूर्ण सामाजिक आणि राजकीय वास्तव अण्णाभाऊ आपल्या साहित्यामध्ये उतरवत होते म्हणून अण्णाभाऊ साठेंना बहुआयामी लेखक म्हणूनही ओळखले जाते.

अण्णाभाऊ साठे हे स्वत: भारतातील अमानुष व विषमतावादी समाज व्यवस्थेच्या पिळलेल्या स्तरात जन्माला आलेले होते. जातीयतेचे, भुकबळीचे, दैन्य, दास्य, दारिद्र्य, अस्पृश्यता, अपमान सहन करुन मानवी जीवनातील विविध पैलूंवर परखडपणे विचार मांडणारे मानवतावादी क्रांतीकारी कलावंत, विषमते विरुध्द लढलेली कॉम्रेड, फुले, शाहु, आंबेडकरी विचारांचे पुरस्कर्ते, नव्या क्रांतीचे भाष्यकार, जाती अंताच्या लढ्याचे तत्वज्ञानी विवेचक, सामाजिक न्यायाचे विचार विश्व असलेले लेखक, साहित्य आणि चळवळीच्या माध्यमातून विज्ञानवादी दृष्टीकोन समाजाला देणारे विद्रोही साहित्याचे निर्माते म्हणून संबंध भारतीय समाजाला ज्ञात आहेत. लोकरंजनातून लोक शिक्षण देणे हा अण्णाभाऊ साठेंचा मुळे पिंड आहे.

डॉ.माधव गादेकर यांनी अण्णाभाऊ साठे यांची साहित्यरचना समर्थ रामदास स्वामींच्या रचनेपेक्षा श्रेष्ठ असल्याचे म्हटले आहे. अण्णाभाऊ साठेंची प्रतिभा समर्थ रामदास स्वामी एवढीच प्रखर व सर्वश्रूत आहे असे प्रतिपादन त्यांनी केलेले आहे. यास संदर्भ म्हणून तुलनात्मक दृष्टीने समर्थ आणि अण्णाभाऊ साठेंच्या रचना त्यांनी समोर ठेवलेल्या आहेत. 'आनंद भुवन' मध्ये औरंगजेब बुडाल्याचे चित्र उभे करताना समर्थ रामदास स्वामी म्हणतात.

बुडाला औरंग्या पापी | म्लेंच्छ संहार जाहला |
मोडली मांडली क्षेत्रे | आनंद भुवनी |

याच विषयक अण्णाभाऊ साठेंनी केलेले वर्णन पाहता, अण्णाभाऊ साठेंनी रामदास स्वामी पेक्षा बरीच उंची गाठली होती याचा प्रत्यय त्यांच्या वर्णनातून येतो अण्णाभाऊ साठे म्हणतात की,

भोगली सैन्य पेंढार | देऊनि त्या मार |
केले बेजार |
औरंगजेब नमविला | दिल्ली खान दमविला |
शाहिस्तेखान शासिला | जी जी जी

अण्णाभाऊ साठेंनी औरंगजेब, शाहिस्तेखान आणि दिल्लीच्या तख्ताची फडफजीती चित्तवेधक स्वरुपामध्ये समर्थ रामदासस्वामी पेक्षाही सरस स्वरुपात लिहून आपली प्रतिभा सिध्द केलेली आहे. समर्थ रामदासांपेक्षाही प्रखार, परखड आणि मार्मिक शब्दांमध्ये आणि संक्षिप्त स्वरुपामध्ये अण्णाभाऊ साठे आपला आशय आणि विषय मांडु शकत होते असे, उपरोक्त रचनेवरुन दिसून येते, परंतू अण्णाभाऊ साठे नावाचा हा तेजस्वी तारा उपेक्षित आणि वंचित राहिला याची खंत आणि सल मनात डोकावते. म्हणजेच अण्णाभाऊ साठेंच्या शब्दप्रपंचाची ताकद आणि मौलिकता यावरुन दिसून येते.

अण्णाभाऊ साठेंच्या साहित्यातील वर्ग संघर्षावर भाष्य करताना प्रा.डॉ.रमेश शेवाळे म्हणतात की, "अण्णाभाऊंच्या साहित्यातील वर्गिय जाणीवा किंवा वर्ग संघर्ष अण्णाभाऊंनी सांगली, सातारा, कोल्हापुर, मुंबई या परिसरासह संबंध जगातील राजकीय क्रांती, सामाजिक

संघर्ष व कामगार कष्टकरी वर्गाचे होणारे शोषण त्यांच्या साहित्यातून प्रतिबिंबित करुन शोषणाच्या विरोधात बंड पुकारणारे खंभीर नायक उभे केडे आहेत. तद्वतच मुंबईन गिरणी कामगार म्हणून काम करीत असतांना कामगारांचे भांडवलदाराकडून होमणारे शोषणही आपल्या कथा, कादंबरी, लावणी, पोवाड्याच्या माध्यमातून मांडले आहे."[२] म्हणजेच अण्णाभाऊ साठे यांचे संबंध साहित्य हे कष्टकरी, श्रमिक, दलित, पिडीतांच्या वेदनांनी भरलेलं आहे अण्णाभाऊंच्या वर्ग संघर्षामध्ये भांडवलदार वर्गाच्या विरुध्द दिलेला लढा हा अण्णाभाऊंच्या मुळ समस्यांमधून प्रतिबिंबित होतो. अण्णाभाऊंनी गिरणी कामगार म्हणून काम करताना जे जीवन अनुभवले ज्या समस्या अनुभवल्या त्यांच्या विरोधात ताकदीने लढा दिला. सामाजिक संघर्श आपल्या साहित्यातून मांडत असतांना, सधन वर्गावर ताशेरे ओढलेले आहेत. एक कंगाल व्यक्तिमत्व भांडवलदारांच्या मनधरणीनुसार राहिले असते तर अण्णाभाऊंचे अवघे आयुष्य ऐशोआरामात गेले असते परंतू अण्णाभाऊ साठेंनी उपासमार सहन करुन, भीषण दारिद्र्याचा सामना करत, वैफल्यग्रस्त जीवन व्यतीत केले परंतू श्रमिक पददलित पिडीतांच्या समस्यांना ते वाचा फोडत राहिले यावरुन, असे म्हणता येईल की, वर्गसंघर्षाच्या लढ्यानेअण्णाभाऊ साठेंचे आयुष्य व्यापून टाकले होते. अण्णाभाऊंनी अवघं आयुष्य या वाटेवर खर्च केलं परंतू कधी तडजोड स्वीकारली नाही हा कणखर बाणा अण्णाभाऊ साठेंना कोल्हापूर, सांगली, सातारा या मातीत स्वराज्यासाठी लढल्या गेलेल्या इतिहासातून मिळालेला होता. या परिसराचा असाही एक संस्कार अण्णाभाऊ साठेंवर झालेला होता.

२ मार्च १९५८ मध्ये झालेल्या अखिल भारतीय दलित साहित्य संमेलनाच्या उद्घाटनपर भाषणात अण्णाभाऊ साठे म्हणतात की, "एका झाडाखाली तीन दगडांची चूल करुन मडक्यात अन्न शिजवून दोन मुल नि बायको यांना जगविणारा हा दलित श्रमिक वरुन कंगाल दिसूत असला, तरी त्याची संसार करण्याची इच्छा केंव्हाही पवित्रच असते. कुटूंब संस्थेवरचा त्याचा विश्‍वास मुळीच ढळलेला नसतो परंतू त्याची कुटूंब संस्थाच भांडवलदारी जगाने त्या झाडाखाली हाकलून दिलेली असते, त्याचे आम्ही निरीक्षण करावे. याची कारण परंपरा शोधावी आणि मगच त्या कंगाल दिसणाऱ्या विषयी लिहावे कारण, या समाजाची घडी न घडी त्या दलिताने व्यापलेली आहे अधिक काव्यमय शब्दांत सांगायचे झाल्यास असे म्हणता येईल की, "हे जग ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरलेली नसून ती दिन दलितांच्या तळ हातावर तरलेली आहे."[३] अण्णाभाऊंच्या शब्दांतील या जाणीवा मन सुन्न करणाऱ्या आहेत. उपेक्षितांना न्याय देताना, त्याची दयनीय अवस्था आणि त्यास कारणीभूत असणारी भांडवली व्यवस्था तद्वतच तो विश्‍वाला पेलून धरलेला महामेरु असल्याचे प्रतिपादन अण्णाभाऊ साठेंच्या विशाल विचार शिखराचे दर्शन दाखवते.

अण्णाभाऊ साहित्यातून वर्गिय जाणीवा स्पष्ट करताना म्हणतात की, "जो कामगार वर्ग संपूर्ण विश्‍वाचा मुलाधार आहे त्याच्या वाट्याला आलेले लाजिरवाने जीवन जगणे संपवून टाकण्याचे मी अवाहन करतो कामगारांच्या मेहनतीच्या हातांमुळेच भांडवलदार ऐषोआरामात जीवन जगतात. मात्र रांत्रदिन राबणारा कष्टकरी झाडाखाली जीवन जगत आहे अण्णाभाऊ संपूर्ण मार्क्सवादाचा सार केवळ एकाच वाक्यात करतात व म्हणतात श्रमिकांच्या हातांनीच विश्‍व उभे राहिलेले आहे."[४] अण्णाभाऊंनी कामगार वर्गाच्या वाट्याला आलेले दारिद्र्यातील जीवन संपवून टाकण्यासाठी अवाहन करत, एक आव्हान उभे केलेले आहे आणि तसा सूचक इशारा कामगारांच्या कष्टावर सुखात जगणाऱ्या भांडवलदार वर्गाला दिलेला आहे.

भारतातील कामगार, कष्टकरी वर्गाला प्रेरित करण्यासाठी 'शिवाजी चला' या गीतामध्ये अण्णाभाऊ साठे म्हणतात की,

"संदी लई नामी आलीया अवंदा
सावकार शाहीचा विखारी कुंदा
आरपार खुरपुन पाडाचा रेंदा
दाखवाया बळा-उचलरे इळा
पोलादी पाजळून आपलारे शिकारी चला"[५]

प्रस्तुत गीतामधून अण्णाभाऊंनी शेतकरी वर्गाला रोजी, शेटजी, लाटजी जे शेतकऱ्याच्या मालाचा कवडी मोल भाव करुन, शेतकऱ्यांच्या भावनांशी खेळत राहतात, त्यांच्या विरुध्द संघर्ष करण्यासाठी प्रेरित केलेले आहे, 'कुंदा' हे शेतात आलेल बादाडासारखा गवत खुरण्यान समुळ उखडुन शेताबाहेर फेकले जाते आणि त्याचे अस्तित्व नाहीसे केले जाते, त्याप्रमाणे सावकारशाहीचा विखारी कुंदा ज्यामध्ये शेतकऱ्यांच्या जमिनी गहाण पडलेल्या आहेत, व्याजाच्या ओझ्याखाली शेतकरी दमछाक होऊन हकनाक आपला बळी देतोय. त्याच्या कबाड कष्टाचे चीज होत नाही, या सर्व समस्यांचे मुळ सावकारशाहीच्या जुलमी गोरख धंद्यामध्ये आहे. त्यामुळे अण्णाभाऊ साठे या सावकारशाहीच्या विषारी वर्गाचे समूळ उच्चाटन करण्याकरीता, शेतकरी वर्गाला प्रेरित करत असल्याचे उपरोक्त पंक्तींमधून पहावयास मिळते. शेतकऱ्यांचे शोषण करणाऱ्या सावकारांविरुध्द बंड करण्यासाठी शिवारी जाण्याचे आवाहन अण्णाभाऊ करतात. एक क्रांतीसूत्र शेतकरी वर्गाच्या हाती देतात.

आजही भारत देशामध्ये, दुष्काळ आणि सततच्या नापिकीला कंटाळून अनेक शेतकरी आत्महत्येचा मार्ग अवलंबून मृत्युला कवटाळतात. सरकार ना-ना प्रकारच्या योजना बनवून, त्यांना वाचवण्याचा प्रयत्न करत आहे, सावकारांच्या पेचात सापडलेल्या आणि खाजगी सावकाराच्या कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्याला वाचवण्याची पराकोटीचे प्रयत्न केले जात आहेत. म्हणजे ही समस्या स्वातंत्र्य पुर्व काळापासून चालत आलेली आहे व आज तिने गंभीर स्वरुप धारण केलेले आहे. परंतू अण्णाभाऊ साठेच्या अवाहनानुसार

शेतकऱ्यांनी, एकजुट होऊन सावकार शाहीचा समूळ नायनाट करुन बेबंद सावकारकीचे उच्चाटन केले असते तर आज ही समस्या अस्तित्वातच नसती, म्हणून अण्णाभाऊ साठेंच्या शेतकऱ्यांप्रती प्रगल्भ वैचारिक जाणीवा याठिकाणी निदर्शनास पडतात.

अण्णाभाऊ साठेंच्या या गीतातून आर्थिक राजकीय व साम्राज्यवाद ही विनाशकारी भांडवलशाहीची अपत्य आहेत, हे सांगण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात. भारतातील ब्रिटीश राजवट ही साम्राज्यवादी व शोषणकारी प्रवृत्तीतूनच जन्माला आलेली होती, म्हणून त्याची पाळमुळ इतकी पक्की आहेत की, ती कीतीही छाटली तरी वरवर छाटली जातात समूळ नष्ट होत नाहीत, एवढी चिवट आहेत. त्यासाठी प्रखर राष्ट्रवादी भावनेने प्रेरित होवून, त्याची पाळमुळ मुळातून उपटली पाहिजेत, वर्ग भेदातून कष्टकऱ्यांच्या वाट्याला आलेले वर्गिय दास्य आणि शोषणांच्या प्रगल्भ जाणीवांतून अण्णाभाऊ साठेंच्या क्रांतीकारी लेखणीला अधिक धार चढलेली पहावयास मिळते.

अण्णाभाऊ साठे ज्या वर्गामधून आले होते, त्या शेतकरी, कामगार, वेठबिगार, दलित, शोषित वर्ग समूहाचे भान त्यांच्या साहित्यविषयक जाणीवांमध्ये व्यक्त झाले आहे. मरणासन्न आवस्थेत असलेल्या समाजाला जागे करण्याचे कार्य त्यांच्या लाल बावट या कला पथकाच्या माध्यमातून ते करत होते. अण्णाभाऊ साठेंची डफावरची थाप म्हणजे भांडवलदार वर्गाची झोप उडवून, त्यांना खडबडून जागे करणारा आवाज होता. अण्णाभाऊ साठे म्हणत असत की, "आता आम्हाला आमचे अस्तित्व सिध्द केले पाहिजे, त्यासाठी श्रमिकांचा लाल झेंडा हाती घेऊन क्रांती करण्यासाठी आम्ही सज्ज आहोत. दुबळे जिणे टाकूण द्यायचे असेल तर क्रांतीची मशाल हाती घेतलीच पाहिजे कारण, शांत राहून निमुटपणे सर्व सहन करणाऱ्या वर्गाला काहीच मिळत नाही तर विजय हा क्रांती करणाऱ्यांचाच होतो हे निर्विवाद सत्य आहे."[६] अण्णाभाऊ साठे वर्ग अंताच्या लढ्यासाठी कशाप्रकारे सज्ज झालेले होते आणि कामगारांच्या क्रांतीला त्यांनी आपल्या अस्तित्वाचा लढा बनविले होते हे यावरुन दिसून येते. अण्णाभाऊ साठेंच्या आंदोलनांनी भांडवलदार वर्गाची झोप उडावी हे व्यक्तिमत्व आता कुठल्या नवीन मागण्या घेऊन समोर येत आहेत, याची त्यांना धास्ती पडायची म्हणून अण्णाभाऊंच्या आवाजाने भांडवलदारांचा थरकाप उडत असे, कारण अण्णाभाऊंना सर्व कामगार ओळखत होतेच, तद्वतच अण्णाभाऊ साठेंचे नेतृत्वही त्यांना मान्य होते. त्यामुळे कामगार वर्ग संपावर घालून कामामध्ये खल पाडणे हे भांडवलदार वर्गाच्या हिताचे नव्हते आणि कामगारांना विरोध करुन, ते आपल्या इच्छा अकांक्षा पूर्णही करु शकत नव्हते, एकीकडे अण्णाभाऊ साठेंनी या लढ्याला आपल्या अस्तित्वाचा लढा म्हणून संबोधले होते. क्रांती करायची असेल तर, मशाल हाती घेतलीच पाहिजे, असे अण्णाभाऊ साठे ठणकावून सांगायचे आणि ही व्यवस्था बदलवून टाकण्यासाठी व्यवस्था परिवर्तनाचे धडे ते कामगार वर्गाला देत असत असे त्यांच्या साहित्यकृतीतून व्यक्त झाल्याचे दिसून येते.

अनेक शोषितांची बरबाद झालेली आयुष्ये, अण्णाभाऊंनी आपल्या डोळ्यात नि डोक्यात टिपलेली होती, परंतू त्यांनी कधीही त्याबाबतचा संयम ढळू दिला नाही. त्यांच्या संयमी मनाला नेहमीच वाटायचं की, "वाढु द्या वर्गाच्या नि जातींच्या डंख मारणाऱ्या वेदना, येऊ द्या उफाळत त्या भांडवलदारांच्या अत्याचारी महासागराला वाढू द्या, त्यांच्या अत्याचारी लाटा आणि पिऊन जाऊ द्या आम्हा दलित महासागरांचे रक्त झोंबु द्या, त्यांच्या वासनामय उष्ण वाऱ्याचे चटके, नि मग होऊन जाऊ द्या एकदाच जाती-जातीचं नि वर्गा-वर्गाचं महायुध्द, जस देशा-देशांच होत, अगदी तस, पुढं भविष्य आहे, क्रांती कारकांच" याच वेळेपासून अण्णाभाऊ साठेंच्या कलावंत प्रतिभेला शाहीरी वाङ्मयाचा तिसरा डोळ फुटला, त्या डोळ्यामध्ये घुमसत होता निखारा, येथेली पाखंडी हिंदुत्ववादी अत्याचारांचा, जाती विषम हिंदू संस्कृतीचा, तिच्या धर्म ग्रंथाचा, सामाजिक गुलामगिरीचा, पोटाची खळगी भरण्याकरिता, धडपडणाऱ्या असंख्य वाळलेल्या पोटांची आणि पोटासाठीच स्वतःचं शरीर विक्रय करणाऱ्या जीवांचा, तेंव्हा मात्र अण्णाभाऊंनी या देशातील आपल्या दलित, श्रमकरी माणसाला प्रमुख स्थान देऊन, शाहीरी वाङ्मयाचा तिसरा डोळा त्यांच्या जीवनावर फिरविला.[७] अण्णाभाऊ साठेंच्या हृदयामध्ये भरलेलं अतिव अशाप्रकारच दुःख आणि वेदना यामधून दिसून येतात. जेंव्हा या दुःखाचा बांध फुटतो तेंव्हा, विद्रोह जन्माला येतो आणि क्रांती करण्यासाठी सज्ज होतो. जीवाच्या आकांताने लढा देण्याची सर्वतोपरी तयारी त्याने केलेली असते. जाती-धर्म, वर्ण, सावकार, जमिनदार, भांडवलदार, कारखानदार यांच्या पाशवी अत्याचारातुन निर्माण झालेलया आकांताने अण्णाभाऊ साठेंच्या साहित्याने जन्म घेतलेला दिसून येतो, म्हणून अण्णाभाऊ साठेंचे साहित्य हे कल्पना विश्वात भिरभिरणार साहित्य नसून ते क्रांती आणि सामाजिक परिवर्तन आवश्यक असणाऱ्या जीवन जगणाऱ्यांच्या वेदनांच साहित्य आहे.

जात आणि वर्ग यांच्या अमानुष अत्याचारातून निर्माण झालेल्या वेदनांनी अण्णाभाऊ साठेंच्या साहित्याची निर्मिती केली आहे. अण्णाभाऊ साठेंनी भांडवलदारांच्या अत्याचाराला महासागर म्हटलेले आहे. त्याचप्रमाणे दलितांच्या रक्तालाही महासागर संबोधून भांडवलदाराच्या अत्याचाराच्या लाटा या दलित रक्ताच्या महासागराला पिऊन टाकतील एवढा, तो अत्याचार मोठा असल्याची भावना अण्णाभाऊ साठेंच्या नजरेत होती आणि याकरिता ते या सर्व गोष्टींचा स्फोट होऊन महायुध्द व्हाव असं म्हणतात कारण त्या युध्दानंतर क्रांती करणाऱ्यांच भविष्य आहे आणि यासाठी अण्णाभाऊने शाहीरीतून शोषित वर्गाला जागे करुन, क्रांती करण्यासाठी पोवाड्यांच्या आणि साहित्याच्या माध्यमातून लढा दिलेले आहेत.

अण्णाभाऊ साठेंनी त्यांच्या समग्र आयुष्यामध्ये लोकजागृतीचे प्रभावी माध्यम म्हणून 'पोवाडा' या कला प्रकाराला लोकभावनेचा कब्जा घेणारे प्रचंड मोठे दालन निर्माण केले. 'पोवाडा' म्हणजे वीररस संपूर्ण झंझावात आहे. अण्णाभाऊंनी जवळपास पंधरा पोवाडे लिहिले आहेत. अण्णाभाऊ महाराष्ट्रातील कम्युनिस्ट चळवळीत वाढलेले सच्चे कलावंत असल्यामुळे, रशियातील समाजवादी क्रांतीचा स्पर्श त्यांच्या साहित्याला झाला नाही तर नवलच ठरले असते. नानकिंग नगरापुढे, स्टालीनग्राडचा पोवाडा, बर्लिनचा पोवाडा, बंगालची हाक, पंजाब दिल्लीचा दंगा, तेलींगाणाचा संग्राम, अमळनेरचे अमर हुतात्मे, मुंबईचा कामगार व काळ्या बाजाराचा पोवाडा हे वर्गिय जाणीवेतून लिहिलेले पोवाडे आहेत. स्टॅलिनग्राडच्या पोवाड्यातून, दुसऱ्या महायुध्दातील रशिया विरुध्द नाझी फौजेच्या विरुध्द पुकारलेल्या बंडाचा तपशिलवार

आढावा अण्णाभाऊ साठेंनी घेतलेला आहे. म्हणून अण्णाभाऊ साठेंच्या पोवाड्यांचा आणि त्यामधून प्रतित होणाऱ्या वर्गसंघर्षाचा आढावा खालीलप्रमाणे घेण्यात आलेला आहे.

### ४.७. अण्णाभाऊ साठेंच्या लावणी लेखनातील वर्गसंघर्ष

लावणी म्हटले की प्रत्येकाला रोमांचीत करणारे चित्र, डोळयापुढे उभे राहते. अश्लिलतेने भरलेल्या तमाशाप्रधान लावणीने हे चित्र तयार केलेले असले तरी लावणी ही अगदी वेगळा कला प्रकार असून अण्णाभाऊ साठेंनी 'लावणी' या कलाप्रकाराच्या माध्यामातून शृंगार, मादकता, मोहकता, अश्लिलता हे प्रकार मुळासकट नष्ट करुन, वेदना, समस्या, आणि वास्तव मांडायला सुरुवात केली. अण्णाभाऊ साठेंच्या लावणीने अंगावर शहारे उभे करत, रोमांचकारी अदाकारीतून समाजाच्या भीषण आणि ज्वलंत समस्यांना फुंकर घातली.

केवळ कल्पनेचे पंख लावून मनोरंजनाच्या अधिनतेत जाऊन, अण्णांची शाहीरी फुलत नव्हती तर तिची मुळे थेट तळागळांत रुजलेली होती. म्हणूनच या अभिनव संकल्पनेतून जन्माला आलेल्या अण्णाभाऊ साठेंच्या शाहीरीस त्या काळचा एक चमत्कार म्हणता येणे शक्य आहे. नव्या महाराष्ट्राची समता, स्वातंत्र्य, बंधुता यांची प्रेरणा देणारी अण्णाभाऊची शाहीरी ही पेशवे काळातील शाहीरी प्रमाणे दत्याची हांजी - हांजी करणारी गुणगाण करणारी नव्हती, तर संकटासारख्या वादळाची पर्वान करता पर्वत शिखराप्रमाणे ती निर्भिडपणे उभी राहणारी शाहीरी होती यात शंका नाही.

मुंबईच्या जीवनातून, अनुभवांतून अण्णाभाऊ साठेंना आपल्या शाहीरी वाड-मयाचा आत्मा मिळाला असून एक वर्गजागृत कामगार आणि सच्चा कम्युनिस्ट या नात्याने त्यांचे शाहीरी वाड-मय विद्रोही आणि क्रांतिकारी होणे अपरिहर्य होते. मुंबईतील ऐश्वर्याचे तसेच कष्टकऱ्यांचे व पोटाच्या भुकेसाठी शील विकण्यांचे समपर्क चित्र शाहीरीत पहिल्यांदाच उतरले आहे. अण्णाच्यां प्रतिभेचा हा उच्चांक आहे. स्वतः शाहीरांने पाहिलेले अनुभवलेले वास्तव प्रतिभेकडेन उतरिवले आहे. म्हणून ते किती ही काळ लोटला तरी अक्षय व आमर राहणारे आहे. मुंबईची लावणीमध्ये मी महाराष्ट्राची राजधानी मुंबईचे वर्णन करताना अण्णाभाऊ साठे म्हणतात की,

"मुंबईत उंचावरी | मलबार हिल इंद्रपुरी |
कुबेराची वस्ती तेथे | सुख भेगती |
परळात राहणारे | रात्रदिवस राबणारे |
मिळल ते खाऊन | घाम गाळती |
फोरास रोड तीन बत्ती | गोलपिठ नाक्यावरती |
शरीर विकुन कीत्येक | पोट भरती |

मुंबईच्या गरीब आणि श्रीमंत वर्गाचे आणि गरीब वर्गाच्या दैन्य अवस्थेचे वर्णन अण्णाभाऊ साठे यांनी या लावणीमध्ये केलेले आहे. मुंबईतील मालबार इंद्रपुरीची उपमा देऊन त्या ठिकाणी राहणारा साधन वर्ग, सुखाचा उपभोग घेत आयुष्य जगतो आहे, आणि एकीकडे परळात म्हणजेच झोपडपटयांच्या वस्त्यामध्ये राहणारे लोक पोटाची खळगी भरण्यासाठी मिळेल ते खाऊन रात्रदिवस कबाड कष्ट करुन यंत्रासमान जीवन व्यतित करत आहेत, त्याचप्रमाणे कित्येक अबला उदरनिर्वाहिसाठी देहविक्रय करुन चरितार्थ चालविण्याचा प्रयत्न करत आहोत, उंचावर ऐशोआरामात राहणारा वर्ग आणि दुसरीकडे दैन्य, दास्य, दारिद्रयात, पिचणारा आणि देहविक्रयाच्या बाजारातील नरकयातना भोगणारा वर्ग हे सर्व सारखीच हाडा मांसाची माणसे असताना, यांच्यामध्ये असणारा हा फरक ही दरी ही असमानता अतिशय मार्मिकतेणे अण्णाभाऊ साठेंनी मांडलेली आहे.

मुंबईतील विषमतेचे, अन्यायाचे, दारिद्रयाचे, कष्टकऱ्यांच्या वेदनेचे आणि भांडवलदार, श्रीमंत शोषकांच्या सुखविलासाचे तुलनात्मक दर्शन, अण्णाभाऊ साठेंनी या ठिकाणी घडविलेले आहे. हे दर्शन समतोल, संयमी आणि हृदयस्पर्शी मांडणीने, अंतर्मुख होण्यास भाग पाडते पुढे अण्णाभाऊ साठे म्हणतात की,

"माणसाला माणूस खांत लुटतं |
आणि लुटलं जात |
तीस लाख लोक एका जागी राहती |"

विकृतता एवढी विदारक आहे की, इथे माणसाला माणूस संपवून टाकतो, त्याला लूटतो आणि लुटलेही जातो निराश्रीतांची ही प्रबळ लोकांकडून होणारी लूट अण्णाभाऊ साठेंनी मांडलेली आहे. शेवटी अण्णाभाऊ साठे म्हणतात की,

"लाल झेंडा घेऊन हाती |
करायला येथे क्रांती |
मजुरांची पिढी नवी पाऊलं टाकती |
अण्णाभाऊ साठे म्हणे
बदलून हे दुबळे जिणे |
होणार जे विजयी ते रण करिती ||"

षंडासारखे निष्प्रभ पडलेल्या लोकांना मरगळ झटकून, क्रांतीसाठी सज्ज करण्याकरीता नव्या चेतना अण्णाभाऊ साठेंनी त्यांच्यामध्ये जागविलेल्या म्हणून अण्णाभाऊ साठे म्हणतात हे दुबळ्यापणाचे, निर्बल जीवन बदलून जे लढा देतील ते यशस्वी होणारच, वेदनेचा शोध घेणे आणि तिच्या उगमाच्या बंदोबस्त करण्यासाठी जनसामान्य कष्टकरी, शोषितांना, कामगारांना कृतीशील बनविले हे अण्णाभाऊ साठेंचा साहित्य लेखनामागील प्रमुख प्रयोजन आहे. कॉग्रेस सरकार बहिरे झाल्यासारखे जनतेचे गऱ्हाणे ऐकत नाही त्यांना जागे करण्यासाठी एकसूचक इशारा देण्यासाठी अण्णाभाऊ साठे म्हणतात की,

"देश लोकशाहीसाठी लढतो |
शेतकरी जमीन मागतो |
ठायी-ठायी चढाई करतो |
पुढे कामगार गर्जतो |
कान पकडून द्यावया हिसडा |
दमानं हळू-हळू निघाला छक्कडा |"

म्हणजेच कामगार वर्ग आणि शेतकरी वर्ग त्याची बैलगाडी घेऊन सरकारचा कान पकडून त्याला हिसडा द्यायला हळू-हळू निघालेला आहे. याची वेळीच दखल नाही घेतली तर सरकारला याचे परिणाम भोगावे लागतील, म्हणून सरकारने सावध होऊन त्यांच्याकडे लक्ष द्यावे अशा आशयाची ही शब्दरचना आहे. बेकायदेशीर या लोकनाटयामध्ये अण्णाभाऊ साठेंनी लावणीव्दारा कथा - निवेदन केलेले आहे. ते म्हणतात की,

"मजुराची कदर नाही मालकाला |
पैशाची धुंदी याच्या डोळयाला |
कौन्सीलात याचा मोठा वसीला |
दडपुन द्यावे कामगांराना बेत याने केला |"

अण्णाभाऊ साठे लावणीच्या माध्यामातून अशी जाहीर आणि परखड टिका करतात दिसून येतात की शासनामध्ये वशिला असणारे मालक लोक यांना पैशाची धुंदी आलेली असल्यामुळे त्या धुंदीमध्ये त्यास काहीच दिसत नसून मजुराची त्याला अजिबात कदर राहिलेली नाही आणि आपल्या विरोधास जाणाऱ्या मजुरानां पैसा आणि वशिला यांच्या जोरावर दडपून टाकण्याचा त्यांचा आवाज उठाव आणि विद्रोह दडपून टाकण्याचा बेत त्यांनी ओळखले आहे, अशी परखड टीका अण्णाभाऊ साठेंनी या लावणीच्या माध्यमातून केलेली दिसून येते.

अण्णाभाऊ साठे मतदारांनी मतदान करुन नेमलेल्या सरकारावर ताशरे ओढताना म्हणतात की,

"उदार होऊनी नेमी सरकार |
लवादाचा ऐका परकार |
लवाद म्हणजे माणूस |
पण जात निराळी असते त्याची |
बेशरम निवड होते न्याय द्याया त्याची |
आणुन नव्या पुराव्याला साथ देती धनिकाला |"

'लवाद' म्हणजे माणूस ज्याची जात निराळीच असते व त्याने उदार होऊन दान दिल्याप्रमाणे सरकार नेमण्याचा प्रकार करतो हा माणूस नव्या धनिक पुढाऱ्याला आणून त्याला साथ देतो बेशरम निवड करतो आणि मग त्याच्या कडुन न्याय देण्याची मागणी वजा अपेक्षा करतो, म्हणजेच मतदारांवर जळजळीत टीका करुन त्यास जागृत करण्यासाठी मार्मिक आणि बोचेल अशा शब्दांत अण्णाभाऊ साठेंनी टीका केलेली आहे. त्यापुढे अण्णाभाऊ साठे म्हणतात की, मुंबईतील अन्यायाचे दारिद्रयाचे कष्टकऱ्याच्यां वेदनेचे आणि भांडवलदाराचे श्रीमंत

शोषकांच्या सुखी दिलाशांचे तुलनात्मक दर्शन अण्णाभाऊ साठेंनी या ठिकाणी घडविलेले आहे हे दर्शन समतोल, संयमी आणि हदयस्पर्शी मांडणी अंतमुर्ख होण्यास भाग पाडते पुढे अण्णाभाऊ साठे म्हणतात की,

"मानसाला मानुस खात, लुटत |
आणि लुटल जात
तीस लाख लोक एका जागी राहती |"

म्हणजेच तीस लाख लोकांच्या या शहराची भयान, विकृतता लुटतो आणि लुटलेही जातो निराश्रीतांची ही प्रबळ लोकांनकडून होणारी लुट अण्णाभाऊ साठेंनी मांडलेली आहे. शेवटी अण्णाभाऊ "साठे म्हणतात की,

लाल झेंडा घेऊन हाती |
करायला येथे क्रांती |
मजुरांची पिढी नवी पाऊलं टाकती |
बदललुन हे दुबळे जिणे |
होणार जे विजयी ते रण करिती |"

षंडासारखे निष्प्रभ पडलेल्या लोकांना मरगळ झटकुन क्रांतीसाठी सज्ज करण्याकरीता नव्या चेतना अण्णाभाऊ साठेंनी त्यांच्यामध्ये जागविलेल्या म्हणून अण्णाभाऊ साठे म्हणतात, हे दुबळयापणाचे निर्मळ जीवन बदलून जे लढा देतील ते यशस्वी. होणारच वेदनेचा शोध घेणे, आणि तिच्या कृतिशील बनविणे हे अण्णाभाऊ साठेंच्या साहित्य लेखना मागील प्रमुख प्रयोजन आहे.

काँग्रेस सरकार बहिरे झाल्यासारखे जनतेचे गऱ्हाने ऐकत नाही, त्यांना जागे करण्यासाठी एकसुचक इशारा देण्यासाठी अण्णाभाऊ साठे म्हणतात की,

"देश लोकशाहीसाठी लढतो |
शेतकरी जमीन मागतो |
ठायी - ठायी चढाई करतो |
पुढे कामगार गर्जतो |
कान पकडून धावया हीसडा |
दमानं हळु हळु निघाला छकडा |"
"लवाद म्हणजे उंट ...
दिसण्यास उंच दिसायचा |
वर्षाला एक पाऊल या हिशोबाने चालायचा |
तोलुन बोल मालकाच्या बाजुने बोलायचा |
न्याय म्हणजे ओठ त्याचा लोबंत रहायचा |
हा न्याय नव्हे अन्याय अपमान कामगार वर्गाचा |"

यावरुन असे म्हणता येईल की, माणूस हा क्रांतीचा कणा आणि ताकद असलेला महत्वाचा घटक असून त्याला उंटाचा उपमा अण्णाभाऊ साठेंनी या ठिकाणी दिलेली आहे. जो नुसता दिसायला उंच आहे, परंतु परिवर्तनात उंटा प्रमाणे अतिशय मंदगतीने मार्गक्रम करतो आणि मालकाच्यांच बाजूने बोलतो उंटाच्या लोबंलेल्या ओठाप्रमाणे न्याय अशी व्यंगात्मक टीका अण्णाभाऊ साठेंनी केलेली असून हा न्याय नाही तर, ते व्यंगाप्रमाणे अपमान आहे असे अण्णाभाऊ साठे म्हणतात.

'खापऱ्या चोर' या लोकनाटयामध्ये सुरुवातीलाच येणाऱ्या लावणीने शासनांची स्वार्थीवृत्ती स्पष्ट केलेली आहे. सत्तेसाठी आपापली लोक कशी कशी आश्वासने देतात, याचा प्रत्यय सदरील लावणीमधून घडवण्याचा प्रयत्न अण्णाभाऊ साठे यांनी केल्याचे दिसून येते, त्याचप्रमाणे देशभक्त घोटाळे या लोकनाटयामध्ये अण्णाभाऊ साठेंनी पुढाऱ्यांची भाषा कशी फसवी असते, त्याची आश्वासने कशी पोकळ असतात याचे वर्णन करुन शेवटी पुढाऱ्यांना आव्हान दिलेले आहे ते म्हणतात की,

"माझा सांगावा सांगा |
जाऊनी कोणी मंत्र्याच्या कानी
तुम्ही रण हरली |
तुम्ही दिलाचेच कच्चे
नाही जाबानीचे सच्चे

यामधून अण्णाभाऊ साठेंच्या आग्रही संघर्षाचे दर्शन घडते. विरोधी पक्षाचा कार्यकर्ता या नात्यांनी सरकारच्या दडपशाहीला तोंड देताना, अनुभवलेला कडवटपणा यातून उपाळून येतो. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रती श्रध्दा अर्पित करणारे, अण्णाभाऊ साठे वर्ग संघर्ष म्हणजेच वर्ग संघर्ष हे सूत्र एकच कसे आहे ते दाखवून देतात, आणि त्यामधून भारतीय दलितांचा लढा एकमुखाने लढवू पाहणारे आशावादी तत्वज्ञान, श्रोत्यांसमोर ठेवणारे गीत "जग बदल घालुनी घाव सांगुन गेले मला भिमराव या मध्ये अण्णाभाऊ साठे म्हणतात की, म्हणजेच कामगार वर्ग आणि शेतकरी वर्ग त्याची बैलगाडी घेवून सरकारचा कान पकडून त्याला हिसाडा द्यायला हळु हळु निघालेला आहे. याची वेळीच दखल नाही घेतली, तर सरकारला याचे परिणाम भोगावी लागतील, म्हणून सरकारन` सावधान होऊन त्यांच्याकडे लक्ष द्यावे अशा आशयाची ही शब्दरचना आहे.

डॉ. माधव गोदकर यांनी अण्णाभाऊ साठेंची तुलना याठिकाणी अनंत फंदी सोबत केलेली आहे. पेशवाईच्या राज्यातील पुणे राजधानीच्या व्यवहाराचे भोंगळ स्वरुप अनंत फंदिने रेखाटलेले आहे तेच सामर्थ अण्णाभाऊ साठेंच्या लावणीमध्ये उतरलेले आहे. फरक फक्त एवढाच की अनंत फंदीने पेशव्यांच्या पुण्याच्या राजधानीचे वर्णन केलेले आहे, तर अण्णाभाऊ साठेंनी महाराष्ट्राची राजधानी मुंबईचे वर्णन केलेले आहेत.

मुंबईतील ऐश्वर्याचे तसेच कष्कऱ्यांचे व पोटाच्या भुकेसाठी शील विकणाऱ्याचे एवढे संपर्क चित्र शाहीरीत पहिल्यांदाच उतरले आहे. अणांच्या प्रतिभेचा उच्चांक आहे. स्वतः पाहिलेले अनुभवलेले वास्तव प्रतिभेकडून उतरविले आहे, म्हणून ते कीतीही काळ लोटला तरी अक्षय राहणारे आहे.)

"गुलामगिरीच्या या चिखलात
रुतुन बसला का ऐरावत
अंग झाडुनी निघ बाहेरी
घे बिनीवरती धाव"

यामध्ये अण्णाभाऊ साठे श्रमिक कष्टकऱ्यांना तू हत्ती आहेस पण गुलामगिरीच्या चिखलात का अडकुन बसला आहेस, असा प्रश्न करुन त्यास अंग झाडून बाहेर निघण्यास आणि क्रांती करण्यास या व्यवस्थेवर हत्तीप्रमाणे चाल करुन जाण्यास, प्रेरित आणि उत्तेजित करताना दिसून येतात, पुढे अण्णाभाऊ साठे म्हणतात.

"धनवंतानी अखंड छळले
धर्माधांनी तसेच पिळले
मगराने जणु माणिक गिळले
चोर जाहले साव |"

धनवंत आणि धर्मपंडित आणि कर्मठ विषमतापुजक वर्ग आणि वर्ण श्रेष्ठींच्या विषयीचा विखार अण्णाभाऊ साठेंनी या स्थापनेतून ओतला आहे. आमची पिळवणूक करुन आम्हाला छळून चोर प्रमाणिक झालेत हे दाखवून देण्याचा प्रयत्न, ते या ठिकाणी करत असल्याचे दिसून येते. यामध्ये शेवटी ते म्हणतात की,

"एकजुटीच्या रस्त्यावरती | अरुद होऊन चल बा पुढती |
मिळुन महाराष्ट्र बा जगती | करी प्रकाश निज नाव |
जगबदल घालुनी घाव | सांगुनी गेले मला भिमराव |"

यामधून मार्क्सवादाचा आणि आंबेडकार वादाचा सुरेख असा समन्वय अण्णाभाऊ साठेंनी साधलेला आहे, त्यानंतर अण्णाभाऊ साठेंनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या लढयामध्ये ज्या 'छक्कड' या कला प्रकारातील लावणीने प्राण ओतुन रणशिंग फुंकले, त्यामध्ये मुंबईतील विषमतेच्या वर्णनासोबतच कामगारांसाठी दयनीय अवस्था रेखाटुन एकजुटीने लढण्यासाठी आंदोलकांना प्रेरित करतात, त्यात ते म्हणतात की,

"ही मुंबई यंत्राची | तंत्राची, जगणाराची मरणारांची
पैदास इथे भलतीच चोरांची | ऐतखाऊंची
शिरजोरांची हरामखोरांची भांडवलदारांची"

अशा त्रासलेल्या शब्दात आपला सत्कार अण्णाभाऊ साठेंनी केलेला आहे आणि लढयासाठी शेवटी सर्वानाच विनंती करताना ते म्हणतात की,

"चीड  बेकीची | गरज एकीची |
म्हणून  विनवनी आहे शिवशक्तीला शाहीराची |
आता वळु नका | रणी पळु नका | कुणी चळु नका |
बिनी मरायची अजुन राहिली | माझ्या जीवाची होतेय काहिली"

या लावणीतील अण्णाभाऊ साठेंचे समाज जीवनाचे आकलन त्यांच्या वर्गिय जाणीवेची खोली, व्यथांचे मुळ शोधण्याची मुलभूत चिकीत्सा करणाऱ्या चिंतनाची कुवत, मढयावर मुठभर माती पडण्या इतपत दुदैवी जीवन जगायला लागूनही विद्रोहाचा वणवा घेऊन पेटलेली कमालीची आशावादी जीवनधारणा या सर्वामधून अण्णाभाऊ साठेंच्या तेजस्वी प्रतिभेचा आणि वर्ग, वर्ण संघर्षाविरुध्द झगडणारा धगधगता अंगार आपल्या नजरेस पडतो. अण्णाभाऊ साठे यांचे हे साहित्य हे आजही जीवनावश्यक संघर्षाचे गणित असून ते अंगावर शहारे उभे करणारे आहेत. असे मला प्रामाणिकपणे वाटते.

**सारांश व निष्कर्ष:-**

पोवाडा साहित्यातील वर्ग संघर्षाचा आढावा घेण्यात आलेला आहे. त्यानुसार अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यात सामाजिक भान, समाजातील संघर्ष परिवर्तनाचा प्रवाह जसा ताकदीने पुढे येतो तितक्याच ताकदीने वर्ग लढ्याचा ऐतिहासिक भौतिकवादी दृष्टांत सुध्दा राजकीय आणि आर्थिक अक्षराने दृष्टिगोचर होतो म्हणजेच वर्णव्यवस्था आणि भांडवलशाहीच्या क्रांतिकारी परिवर्तनाचे अण्णाभाऊ साठे हे साक्षीदार होते हे संपूर्ण सामाजिक आणि राजकीय वास्तव अण्णाभाऊ साठे यांनी आपल्या साहित्यात उतरविले म्हणून अण्णाभाऊ साठे हे बहुआयामी व्यक्तिमत्व होते असा त्यांचा उल्लेख केल्यास ते वावगे ठरणार नाही.

मुंबई ही महाराष्ट्राचा आत्मा म्हणून तिला मैनेची उपमा देऊन आपल्या लावणीच्या माध्यमातून लोकांसमोर तिचे आकर्षण अण्णाभाऊ साठेंनी निर्माण केले. बेळगाव, कारवार, निपाणी डांग, डंबरगाव या मराठी भाषिक शहरांना दक्षिण कानडी राज्यांपासून मुक्त करुन महाराष्ट्रामध्ये सामील करण्यासाठी अण्णाभाऊ साठे यांनी आपली तळमळ व्यक्त केली व तिच तळमळ महाराष्ट्रातल्या प्रत्येक माणसाच्या मनामध्ये निर्माण केली आणि त्या तळमळीतून प्रचंड असा राष्ट्रव्यापी लढा महाराष्ट्रामध्ये उभारला गेला. थोडक्यात असे म्हणता येईल की संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ही फक्त राजकीय नेते किंवा कार्यकर्त्यांची नव्हती तर यामध्ये साहित्यिक शाहीर विचारवंत यांची ही चळवळ होती म्हणून त्या चळवळीचे प्रमुख शिलेदार म्हणून अण्णाभाऊ साठे यांच्याकडे पाहिजे जाते. अण्णाभाऊ साठेंनी यामध्ये केवळ गीत गाण्याचा प्रयत्न केला नाही तर नेत्यांप्रमाणे भाषण करुन लोकांना संपूर्ण विषय समजावून सांगण्याचा प्रयत्न केला.

**संदर्भ सुची :-**

१. प्रा.डॉ. शेवाळे रमेश, अण्णाभाऊ साठे मानवतावादी विचारवंत संपादक प्रा.डॉ.- मनोहर सिरसाट, शौर्य प्रकाशन , लातुर - २०१८ प्र.क्र. १४९
२. तत्रैव - प्र.क्र. १५०
३. डांगळे अर्जुन (संपादक), लोकशाहीर अण्णाभाऊ साठे निवडक वाड-मय महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व इतर,मुंबई - १ ऑगस्ट १९९८ प्र.क्र. ११७६
४. प्रा.डॉ. शेवाळे रमेश, पुवोक्त, प्र.क्र. १५१
५. तत्रैव - प्र.क्र. १५२
६. तत्रैव - प्र.क्र. १५३
७. कठाळे नानासाहेब, पुवोक्त, प्र.क्र. ६९